# जलसाक्षरता अंतर्गत जिल्हास्तरीय जलसाक्षरता समिती बैठक

आज गुरुवार, दिनांक १३/१०/२०२१ रोजी दुपारी ११.३० वाजता.मा. अध्यक्ष, जिल्हास्तरीय जलसाक्षरता समितो तथा जिल्हाधिकारी, कोल्हापुर यांचे अध्यक्षतेखाली रार्जर्षि शाहूजी सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे जिल्हास्तरीय जलसाक्षरता समितीची बैठक आयोजित करणेत आलेली होती. सदरील बैठकीमध्ये खालील विषयावर चर्चा झाली.

## इतिवृत्त

1. मा.सदस्य सचिव, जिल्हास्तरीय जलसाक्षरता समितो यांनी बैठकीची प्रस्तावना केली व मागील बैठक आयोजनाबाबत माहिती दिली.
2. मा.अध्यक्ष यांनी सुरवातीला जिल्यातील मुबलक पाणी काटकसरीने वापर व पाणी अडवून अधिक प्रभावीपणे जलसाक्षरता राबविण्याची आवश्यकता सांगितली.
3. याकरिता जिल्हास्तरीय जनजागृती मोहीम व प्रेसनोट देण्याचे कळविले.
4. याकरिता तालुक्याच्या ठिकाणी एक गाव निवडून सदस्य सचिव, यांचेकडे आज सायंकाळपर्यंत WhatsApp द्वारे कळविण्याचे सांगितले. या प्रत्येक गावामध्ये शोषखड्डे तयार करण्याचे सांगितले. याबाबत तहसीलदार व BDO यांनी याबाबत यंत्रणा कार्यान्वित करून तपासणी करून तसा अहवाल देण्याचे कळविले . यासाठी पाणी फौंडेशनचे App वापरून शोषखड्डे तयार करण्याबाबत मार्गदर्शन घेण्याबाबत सांगितले. याची माहिती जिल्हापरिषद व पाटबंधारे विभाग यांनी अध्यक्ष यांना कळविण्याचे सांगितले.
5. शेवटी मा.अध्यक्ष यांनी टप्पा-टप्पाने कृती कार्यक्रम राबवून जलसाक्षरता अधिक प्रभावीपणे राबवियासाठी सांगून समारोप केला.

दि.नां.क - १३/१०/२१

सदस्य सचिव, जलसाक्षरता जिल्हास्तरीय समिती
तथा
कार्यकारी अभियंता, कोल्हापूर पाटबंधारे विभाग (उत्तर),
कोल्हापूर.

जिल्हाधिकारी कार्यालय,
कोल्हापूर,
13 OCT 2021
उपजिल्हाधिकारी

RR-1480

का/वि/८२/२०२१